## प्रकरण **18** वे
## इतर उपयुक्त माहिती

अ) रुग्णालयात रक्तपेढी आहे का?

उत्तर) रुग्णालयात रक्तपेढी नाही.

ब) शुल्क खाटा आहेत का?

उत्तर) नाही, येथे शुल्क खाटा नाहीत.

क) वैद्यकिय अधिकारी उपलब्ध असतात का?

उत्तर) होय, 24 तास उपलब्ध असतात.

ड) औषधोपचारासाठी काही शुल्क आकारले जातात का?

उत्तर) औषधोपचार निशुल्क आहे.

इ) तात्काळ सेवा / अपघात विभाग आहे का?

उत्तर) येथे अपघात विभाग नाही. परंतु अतिगंभीर व आवश्यक सेवेच्या रुग्णाला 24 तास सेवा दिली जाते व आवश्यकतेनुसार त्यांना भरती केले जाते वैद्यकिय पोलिस केसेस असल्यास प्राथमिक उपचार करुन त्यांना मोठया रुग्णालयात नोंदणी करुन उपचारासाठी पाठविले जाते.

फ) क्षकिरण आणि हृदयस्पंदन आलेख शुल्क भरावे लागतात का?

उत्तर) होय ! सवलतीचे शुल्क आकारले जाते.

2) जर एखादया रुग्णाला छायांकित कागदपत्राची प्रतिची आवश्यकता असल्यास साध्या कागदावर स्वतःचे नांव, पत्ता, दुरध्वनी क्रं., लिहून, कोणती कागदपत्रो हवी आहेत. त्याचे कारण, कागदपत्राचे शुल्क भरुन सही करुन हवी आहेत. त्याची कारणे, कागदपत्राचे शुल्क भरुन सही करुन हा अर्ज प्रमुख वैद्यकिय अधिका-यांकडे पाठविला जातो. त्यांच्या मंजूरीनंतर ती प्रत उपलब्ध करुन दिली जाते.

**3)** रुग्णांना जनतेला दिले जाणारे प्रशिक्षण

रुग्णांना / जनतेला खालील प्रमाणे प्रशिक्षण दिले जाते. लसीकरण / जलसंजिवनी - एच.आय.व्ही. एड्सवर माहिती आणि शिक्षण

हे सर्व प्रशिक्षण निशुल्क असून बाहयरुग्ण विभागात समाज विकास अधिकाऱयांमार्फत दिले जाते. या शिक्षणात पोष्टर्सचा उपयोग केला जातो यासाठी पूर्व सुचनेची गरज भासत नाही. सामाजिक उपक्रमात भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांना आरोग्य विभागातील कर्मचारी तयार करतात.

रुग्णालयातून उपलब्ध केली जाणारी प्रमाणपत्रो

| अ.क्रं. | दाखल्याचे नांव | आकार | कोणाकडून |
|---|---|---|---|
| 1. | वयाचा दाखला | रु. 30 | नोंदणी सहाय्यक |
| 2. | उपचारा खालीचा दाखला | रु. 30 | नोंदणी सहाय्यक |
| 3. | तब्येत ठिक असल्याचा दाखला | रु. 30 | नोंदणी सहाय्यक |
| 4. | आजारपणाचा दाखला | रु. 30 | नोंदणी सहाय्यक |

वरील प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यास साध्या कागदावर नाव, पत्ता, दुरध्वनी क्रं. आवश्यक असलेल्या दाखल्याचे नांव, तपासणीपेपरची छायांकित प्रत इत्यादीची पूर्तता करुन नोंदणी सहाय्यकाकडे दिल्यावर योग्य ते शुल्क भरुन वैद्यकिय अधिका-यांच्या / प्रमुख वैद्यकिय अधिकाऱयांच्या मंजूरीनंतर त्याच दिवशी नोंदणी सहाय्यकाकडून दिली जातात.


स. का. पाटील<br>
महानगरपालिका<br>
सर्वसाधारण<br>
रूग्णालय<br>
माहितीचा अधिकार (माहिती पुस्तिका)<br>
दफ्तरी रोड, मालाड (पू)<br>
फोन नंबर : **28899447 / 28894381**